**गद्यपाठ २ –प्रधान**
**रामचंद्रपंत आमात्य**
**ठळक मुद्दे**

- **पाठाचे नाव -प्रधान**
- **लेखक-**रामचंद्रपंत अमात्य , काळ- १६५० ते १७१६.
- **प्रधान म्हणजे -** राज्यरक्षण करणारा स्तंभ, राज्याची नवनिर्मिती करणारा, राजाची सत्ता वाढवणारा, प्रजा,धर्माचे रक्षण करणारा प्रमुख, अन्यायाला मर्यादा घालणारा, नृपाची विश्रांती, परलोकपंथीची दीपिका.
- **प्रधानाचा लोकांमधील दर्जा-**सरकारकून, लोकांपेक्षा वरचढ,राजाचा बाहू, राजबंधू,
- **प्रधानाने पाळायची शिस्त-** अशिष्ट न बोलणे, भांडण-तंटा न करणे, लोकांमढील दरारा कायम ठेवणे
- **प्रधान निवडीमागील विचार/ प्रधान कसा व कोणास निवडावे?-** राजाच्या गुणांसमान असावा, कुलीन, कार्याकार्यविचक्षण, शास्त्राचा अभ्यासक, राजधर्म उत्तम जाणणारा, पापभीरु, स्वामीसेवकाप्रमाणे वर्तन करणारा,साम-दाम-दंड-भेद-संधि,-विग्रह-मित्रभेद-मित्रसंधानादि तंत्र माहित असणारा, चतुर
- **प्रधान कोण नसावा-**चोरी करणारा, स्वामीसेवाभाव नसलेला,व्यसनी,दुराग्रही, मत्सरी.
- **प्रधानाचा मानमरातब-** सरकारकून, सर्वसामान्य काकुनापेक्षा वरचढ मान असावा.
- **प्रधानाच्या चुका सांगायची पद्धत-** अवगणना, अपमान न करता, इतर लोकांसमोर उघडे न पाडता, युक्तीच्या वाटेने.
- **प्रधानाखालील दुय्यम अधिकाऱ्याकडे असण्याचे गुण-** प्रधानाच्या बरोबरीचा, योग्य न्याय निवाडा करू शकणारा,
- **प्रधानाचे अंतिम ध्येय-** स्वामीसेवाभाव बाळगून इतरांनाही तसेच वागायला लावणे, राज्याचे संरक्षण, न्याय-अन्याय समजणे व त्यानुसार शासन करणे, राज्यास व राजास आधार देणे.

**ऐतिहासिक विषयावरील साहित्य वाचून पाहताना:**

**अष्टप्रधान मंडळ** ही संकल्पना आपल्याला सातवीच्या इतिहासात परिचयाची झाली आहे. ह्या अष्टप्रधान मंडळात **रामचंद्रपंत अमात्य** हे एक प्रधान होते. त्यांच्या '**आज्ञापत्र**' ह्या ग्रंथातून 'प्रधान' हा पाठ घेतला आहे जो आपण येथे अभ्यासणार आहोत.

शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीविषयी आणि राज्यकारभाराविषयी आपल्याला अभिमान आणि कौतुक का वाटते? कारण, राज्यकारभार कसा असावा, त्यातील अनुशासन कसे असावे ह्याविषयी शिवाजी महाराजांनी अतिशय सूक्ष्म विचार केला होता. त्याविषयी त्यांना अतिशय स्पष्ट आणि सखोल ज्ञान होते. अमात्यांनी हे ज्ञान व दूरदृष्टी महाराजांसोबत राज्यकारभारात सहभागी होऊन आत्मसात केले होते. म्हणूनच, राज्यकारभार चालवायला केवळ राजा नव्हे तर त्याचे साथीदार म्हणजे प्रधान हे कोणत्या क्षमतेचे व गुणांचे हवेत ह्याचे अतिशय चिकित्सक वर्णन आमात्य करू शकले.

**अष्टप्रधान मंडळ -**

http://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%B6%E0%A4%BF%E0%A4%B5%E0%A4%95%E0%A4%BE%E0%A4%B2%E0%A5%80%E0%A4%A8_%E0%A4%85%E0%A4%B7%E0%A5%8D%E0%A4%9F%E0%A4%AA%E0%A5%8D%E0%A4%B0%E0%A4%A7%E0%A4%BE%E0%A4%A8%E0%A4%AE%E0%A4%82%E0%A4%A1%E0%A4%B3

**रामचंद्रपंत अमात्य**

http://marathivishwakosh.in/khandas/khand14/index.php?option=com_content&view=article&id=10416

**आज्ञापत्र**

http://www.marathivishwakosh.in/index.php?option=com_content&view=article&id=4827%3A2010-11-15-06-28-12&catid=2&Itemid=3

**अष्टप्रधान मंडळ करण्यामागील पार्श्वभूमी**

आपण हे लक्षात घ्यायला हवे की, शिवाजी महाराजांचा काळ हा आजपासून ४०० वर्षांपूर्वीचा काळ होता जेव्हा अष्टप्रधान मंडळ तयार झाले. आपले राज्य, मुलुख व वतने राखण्यासाठी व मिळवण्यासाठी लढाया, चढाया आणि आक्रमणे हे त्यावेळचे नियमित जीवन होते. अशा अस्थिर काळात शिवाजी महाराजांना अनेक धोके जाणवत होते. स्वत:ला राजा म्हणून प्रस्थापित करायचे होते. रयतेने त्यांना स्वीकारावे असे महाराजांना वाटत होते. त्यामुळे, राज्याचे परकीय आक्रमणापासून संरक्षण करणे, रयतेला सुखी ठेवणे, इतर राजांसारखे त्यांना न छळणे, त्यासाठी जबाबदार प्रधान आणि सरदारांची नेमणूक करणे अशा बाबींचा विचार त्यांनी प्राधान्याने केला.

शिवाजीमहाराजांची स्वराज्याची कल्पना आयती किंवा तयार नव्हती. ती त्यांना तयार करावी लागली. त्यासाठी लागणारे कायदे, नियम व मार्गदर्शक तत्त्वे बनवावी लागली. ह्या संदर्भात आज्ञापत्रातील दिलेला उतारा वाचला तर काय समजते? तर प्रधानाचे लोकांमधील स्थान काय आहे. त्याच्याकडे काय गुण असायला हवेत. त्याला राजासारखा मान का हवा? वेळप्रसंगी त्याने राज्याच्या भल्यासाठी नीती बदलायला कशी हवी इत्यादी. **'प्रधान' ह्या पदाचा विविध अंगाने झालेला सूक्ष्म विचार पाठातून समोर येतो.**

**प्रधानाची लक्षणे लिहिण्यामागील भूमिका काय असावी?**

पैशाच्या व संपत्तीच्या लोभाने तयार होणारी फितुरी, फुटीर मनोवृत्ती परिणामत: राजा आणि राज्याचे नुकसान करून जाते. ह्याचा अनुभव व जाण शिवाजी महाराजांना होती. हे धोके टाळण्यासाठी राज्याला भक्कम अधिकारी हवेत. अधिकारी व्यक्तींनी जसे स्वामीनिष्ठ असले पाहिजे तसेच अधिकारी व्यक्तीला मानमरातब व जबाबदारीही दिली पाहिजे,हे महाराज जाणून होते. ह्या विचारांचा सुरेख मेळ 'प्रधान' ह्या पाठातून **अमात्य** मांडतात.

**'आज्ञापत्र' हा ग्रंथ त्यानी आपल्या उत्तर आयुष्यात लिहून काढला. रामचंद्रपंत अमात्य स्वत: अष्टप्रधान मंडळात असल्यामुळे व शिवाजी महाराजांसोबत जवळून काम केलेले असल्यामुळे, शिवाजीमहाराजांच्या धोरणांचेच प्रतिबिंब त्यात दिसते**.

**पाठातील प्रमुख मुद्दे-**

**प्रधान असणे हे जबाबदारीचे काम** :अमात्यांनी प्रधानाला अतिशय महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली आहे. ज्यात आपल्या राज्यकारभाराचा प्रसार करणे (नृपसत्ताप्रसारक), प्रजेचे संरक्षण करणे (प्रजापालणधर्मसंरक्षण), अन्याय होऊ न देणे, दुसऱ्या शब्दांत राज्याचे आधारस्तंभ बनणे अशा जबाबदाऱ्यांचा समावेश आहे. राजाला निश्चिंत वाटेल असा, राज्यकारभार चालवण्यास योग्य व्यक्ती 'प्रधान' असतो. प्रधान राजाला सर्वात जवळ असणारी व्यक्ती असते म्हणजे जणू राजाचे हात. नातेवाईकाइतकी प्रधान ही विश्वासू व्यक्ती असते.

**प्रधानाचा मानमरातब**: प्रधानाला जशा जबाबदाऱ्या आहेत तसे अधिकारही आहेत. त्याचा धाक इतरांपेक्षा अधिक आहे. त्याचे शासन सर्वांवर चालायला हवे. लहान मोठे निर्णय कारभा-यांच्या विचारांनी करावे. सर्वसामान्य काराकुनापेक्षा त्याचा दर्जा श्रेष्ठ आहे. त्यामुळे त्यांना छोट्यामोठ्या गोष्टीत नाराज करता कामा नये. .परंतु हा दर्जा एकाएकी तयार होत नाही व वाढतही नाही. त्यामुळे प्रधानाने देखील लोकांमध्ये आपला दर्जा कायम ठेवला पाहिजे. त्यासाठी सामान्य जनतेत वाटेलतसे संभाषण वा वाईट वाणीने,परंपरेने आलेला मान/धाक घालवू नये. नाहीतर मान गेलेल्या प्रधानाचा धाक लोक काय बाळगणार? अशा प्रधानाचे म्हणणे लोक कसे ऐकणार? म्हणणे एकले नाही तर राज्यकारभार कसा चालणार?त्यामुळे प्रधान म्हणजेच '**सरकारकून**' नेमताना खूप विचारपूर्वक नेमावा. वरील गुणांची परीक्षा करून , राजकार्य पार पाडण्यात चोख असणारी व्यक्ती पाहून नेमायला हवी. ही पदवी राजाच्या खालोखाल असून त्या पदावरील व्यक्तीत राजासारखे गुण हवेत.

चारित्र्यवान,अनुभवी,चांगले वाईट जाणणारा,शास्त्र जाणणारा,राजधर्मजाणणारा,धर्माच्या दृष्टीने वाईट असलेल्या गोष्टी न करणारा,इमानदार असा विविधगुणसंपन्न हवा. प्रधानाचा दरारा लोकांमध्ये राहण्यासाठी प्रधानाकडे अधिकार आहेत तसेच तो अधिकार टिकवण्याची जबाबदारीही त्याच्यावर आहे व त्यासाठी तो गुणवान हवा.

**प्रधान पदी नेमताना त्या व्यक्तीमध्ये पुढील गुण असावेत.-**

प्रतिस्पर्ध्याशी सामना करताना **साम-सामोपचार,दाम-पैसा,भेद-विरोध,दंड-शिक्षा,संधी-तह,विग्रह-विभाजन, मित्रभेद-मैत्री संपवणे, मित्रासंधानादी-योग्य व्यक्तीशी मैत्री जोडणे** ह्या सर्व नीतींचा परिचय प्रधानाला असावा. ह्या नीतीना योग्य त्या वेळी वापरण्याची समज प्रधानाकडे असायला हवी. ह्या शिवाय जो अनेक वर्ष सेवा करत आहे व ज्याच्या मागील पिढ्यांनीदेखील राजाची सेवा केली आहे त्याचे कौतुक करावे.

**कोणाला टाळावे, काय टाळावे, काय घ्यावे-**

व्यसनी किंवा दुराग्रही माणसाला मात्र त्यागावे. आपण काटेरी झुडपाचे फूल घेऊन काटे टाकून देतो त्याप्रमाणे प्रधान ज्या कुटुंबातून आला आहे त्याच्या नात्यातील जो सुगुणी व लायक व्यक्ती आहे त्याला हाताशी घ्यावे. सर्वगुणसंपन्न असला तरी त्या व्यक्तीस लगेच सरकारकून करू नये. तर, त्याच्यातील गुणवैशिष्ट्यांची वाढ करत करत त्याला प्रधान पदाला न्यावे. प्रधान झाला म्हणून त्याच्या हातून चूक होणार नाही असे नाही. तरी ती चूक

सर्वांसमोर न सांगता युक्तीने जाणवून द्यावी. सरकारकुन सहजासहजी मिळत नसल्याने त्याचा मान राखाणे आवश्यक असते व त्याबाबत सावध असणे गरजेचे असते.

प्रधानला देखील त्याच्या हाताखाली माणूस म्हणजे दुय्यम अधिकारी द्यावा. तो गुणसंपन्न हवा. प्रधानाने काम सोपवताना त्याच्या जवळच्या लोकांकडे जे गुण आहेत त्यानुसार काम द्यावे.

**प्रधानाने बाळगायची दृष्टी-**

प्रधानाने स्वामीसेवक भाव बाळगून इतरांनाही तशीच वागणूक द्यायला हवी. मुलकाचे संरक्षण हे परम कर्तव्य असून, न्याय-अन्यायाची जाण ठेऊन प्रधानाने शासन करायला हवे.

**अमात्यांचे वैशिष्ट्य**

रामचंद्रपंत अमात्यांनी प्रधानाच्या गुणवैशिष्ट्याविषयी, अधिकार-जबाबदाऱ्यांविषयी लिहताना,राज्यकारभार चालवताना किती बारीक गोष्टींचा विचार केला आहे हे ह्या पत्रातून आपल्यासमोर येते.राज्याचे, राजाचे व प्रजेचे संरक्षण हे प्रधानाचे महत्कार्य तर आहेच परंतु अंतर्गत पातळीवर राज्यकारभार चालवताना त्याच्यात चांगले वाईट ओळखण्याची विवेकबुद्धी व प्रसंगी धूर्तपणे योजना करण्याची चलाखी असली पाहिजे असेही अमात्य सूचित करतात. **प्रधान -राजाला बांधिल हवा व प्रधानाचे हस्तक -प्रधानाला बांधिल हवेत.** अशा प्रकारे खालपासून वर पर्यंत एक **शिस्तबद्ध राज्यकारभाराचे नियोजन** या आज्ञापत्रातून अमात्य सांगतात.

**<u>उजळणी प्रश्न</u>**

पुढील प्रश्नांच्या आधारे धड्याचा विचार करा व ३० ते ४० शब्दांत उतरे द्या.

१) ' नृपसत्ताप्रसारक' अशा विशेषणांसारखी आणखी कोणती विशेषणे प्रधानातील गुणवैशिष्ट्ये दाखवण्यास पाठात वापरली आहेत व का?

२) प्रधानाचा दरारा कशाने वाढतो?

पुढील प्रश्नाच्या आधारे धड्याचा विचार करा व ५० ते ६० शब्दांत उत्तरे द्या.

१) 'सरकारकून' ह्या पदवीस कोण लायक ठरतो व का?

२) प्रधानाकडून जाणते-अजाणतेपणी झालेली चूक सांभाळून कशी घ्यावी व का घ्यावी असे अमात्य सांगतात?

३) प्रधानाचे लोकांमधील वर्तन कसे हवे?

संदर्भांसहित स्पष्टीकरण द्या:

१) पांचा टक्याचे प्याद्यापासून सरकारकूनपर्यंत भिडेची परंपरा.

२) जैसे कंटकपुष्पवृक्षाची पुष्पें मात्र घेऊन कंटकाचा परित्याग करिजेतो या न्याये त्याचा (अयोग्य व्यक्तीचा) परित्याग करावा.

**<u>मुक्त प्रश्न</u>**

भाषेविषयी:

१) तुम्हाला पाठातील पुढील अलंकार शोधता येतील का? (अलंकार ह्या टिपणाचा आधार घ्या.)
   अ. उपमा ब.उत्प्रेक्षा क.दृष्टांत

२) प्रधान धड्यातील कोणताही एक उतारा आजच्या भाषेत लिहून काढा. झालेले बदल पुढील मुद्द्यांच्या मदतीने तुम्हाला सांगता येतील का?
   - सामान्यरूपे मूळ पाठात कशी आहेत व बदल केलेल्या वाक्यांत कशी झाली?
   - अव्यये कोणकोणती आहेत?
   - भाषेला वजन आणणारे शब्द कोणते?

३) प्रधानाचे गुणवर्णन ज्या शब्दांनी केले आहे त्या शब्दांना आत्ताच्या भाषेतील योग्य पर्यायी शब्द शोधा.

| | |
|---|---|
| कुलीन | |
| कृतकर्म | |
| कार्याकार्यविचक्षण | |
| शास्त्रज्ञ | |
| पापभिरू | |
| दैवतैकनिष्ट | |
| दर्शनीय | |

४) 'प्रधान' या पाठातून सांगितलेले प्रधानाचे गुण आजच्या काळाला लागू पडतात का? राजा आणि प्रधान हे नाते आजच्या काळाशी सुसंगत वाटते का ह्या विषयी वर्तमानपत्रासाठी लेख लिहा.

५) आज्ञापत्रातील 'राजाची कर्तव्ये'१,२,३ हा आणखी एक उतारा वाचा. या उताऱ्यावरून लक्षात आलेले प्रधान व राजा यांचे नाते तुमच्या शब्दांत लिहा.